अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः
माझे नावः मनोज काशिनाथ जाधव
वयः ३६ वर्षे, व्यवसायः मजूरी,
राहणारः वांगणी, ता. रोहा.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत सुरु.**

०१. दि.०२.०४.२०२१ रोजी मी माझे घरी होतो. त्या दिवशी मला माझे चुलते अनंत जाधव यांचा वांगणी–बारशी गावाचेमध्ये अपघात झाल्याबाबत मला माझे मुलाने सांगितले. त्यावेळी काका अनंत जाधव पायी जात होते. त्या दिवशी आरोपीने त्याचे मोटार सायकलने काका अनंत जाधव यांना उडविल्याचे मला समजले. सदर मोटार सायकलचा नोंदणी क्रमांक मला आठवत नाही. त्यानंतर मी कोकणे हॉस्पिटल येथे गेलो असता काका अनंत यांचे डोक्यातून रक्त येत असल्याचे मला दिसले. तेथे त्यांचा प्राथमिक उपचार करून डॉक्टरांचे सल्ल्याप्रमाणे काकांना एम.जी.एम.हॉस्पिटल, मुंबई येथे नेले.

०२. सदर घटनेची प्रथम खबर मी पोलीस स्टेशन, नागोठणे येथे दिली. आता मला सदर खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर खबर सह जबाब यास **नि.क्र.१४** देण्यात येतो.

०३. मी आरोपीस डॉ.कोकणे यांचे हॉस्पिटलमध्ये बघितले होते. मी त्यांना ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. (अर्ज नि.क्र.१३ वरील आदेशाप्रमाणे आरोपीस आज न्यायालयात हजर राहण्यापासून सुट देण्यात आली.)

सरतपास पूर्ण.

**उलटतपास सर्व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०४. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची माहिती मिळाल्यानंतर मी सरळ डॉ.कोकण यांचे हॉस्पिटलमध्ये गेलो. घटनेसंबंधी खबर मी रात्री ०८.३० वा. चे दरम्यान दिली. हे म्हणणे खरे आहे की, डॉ.कोकणे यांचे हॉस्पिटलपासून पोलीस स्टेशन, नागोठणे दहा मिनिटांचे अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासणीमध्ये खोटी साक्ष दिली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.07.04 15:38:08 +0530

(एस. एस. महाले)

दि. ०४.०७.२०२२ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.